# फॉरेन्सिक लॅब असते कशी?

**न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, संचालनालय ही प्रयोगशाळा महाराष्ट्र शासनाच्या गृहविभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असून, ती पोलिसांना गुन्हे तपासाच्या कामी शासकीय मदत उपलब्ध करून देते. या मदतीमुळे पोलिसांचे गुन्हा तपासाचे व गुन्ह्याची उकल करण्याचे काम फारच सुलभ होते.**



**न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेमध्ये खालीलप्रमाणे विभाग कार्यरत आहेत.**

**१) विषशास्त्र विभाग** (Toxicology Division) :

या विभागामध्ये विषबाधेने मृत्यू झालेल्या अथवा प्रभावित झालेल्या मयताचे / प्रभावित व्यक्तीचे व्हिसेरा, रक्त, उलटी, लघवी इत्यादीचे विषासाठी परीक्षण करण्यात येते. विषबाधेने प्रभावित झालेल्या व्यक्तीस विषाचे त्वरित निदान झाल्यास व तातडीने उपचार झाल्यास बाधित व्यक्तीस जीवदान मिळू शकते. तसेच विष परीक्षणामुळे मृत्यूचे निश्चित कारण देता येते.

**२) जीवशास्त्र विभाग** (Biology Division) :

या विभागामध्ये खून, मारामाऱ्या यांसारख्या गुन्ह्यातील रक्त, रक्ताने माखलेल्या वस्तू, हत्यारे इत्यादी वस्तू रक्ताचे परीक्षण व त्याचा गट निश्चित करण्यासाठी पाठविल्या जातात. त्यांच्या परीक्षणामुळे गुन्हेगारापर्यंत पोहोचणे पोलिसांना शक्य होते. त्याचप्रमाणे बलात्काराच्या प्रकरणातील मुद्देमाल जसे, व्हॅजीनल स्वॅब, सीमेनचे डाग असलेले कपडे इत्यादी वस्तू बलात्कार झालेला आहे किंवा नाही याच्या परीक्षणासाठी पाठविण्यात येतात.

**३) डीएनए :**

रक्त गट व अत्यल्प प्रमाणातील रक्त यांचे परीक्षण व त्यांचा तुलनात्मक अभ्यास या विभागात करण्यात येतो.

**४) क्षेपणास्त्र विभाग** (Balistic Division) :

या विभागामध्ये बंदुकीच्या फायरिंगमुळे घडलेल्या गुन्ह्यातील मुद्देमाल पाठविण्यात येतो. यामध्ये प्रामुख्याने फायरिंग झालेली बंदूक, उडवलेल्या पुंगळ्या, रक्ताने माखलेले कपडे, घटनास्थळावरील फायरिंगसंबंधी जप्त वस्तू यांचा समावेश होतो. बंदुकीतून फायरिंग झाले आहे किंवा नाही, किती अंतरावरून फायरिंग झाले, बंदुकीचा मेक इत्यादीचे परीक्षण करून अहवाल देण्यात येतात.

**५) सामान्य विश्लेषण व उपकरणीय विभाग :**

या विभागामध्ये भेसळयुक्त पदार्थ, मादक पदार्थ इत्यादी पदार्थ दाखल करण्यात येतात. बॉम्बस्फोटामध्ये शिल्लक राहिलेल्या अवशेषांचे परीक्षणदेखील याच विभागात केले जाते. यूव्ही, जीसी, आम स्पेक्ट्रोग्राफ यासारखी अत्याधुनिक उपकरणे या विभागातील परीक्षणासाठी तसेच आवश्यक तेव्हा इतर विभागातील पदार्थांच्या परीक्षणासाठीदेखील वापरली जातात.

**६) भौतिकशास्त्र विभाग :**

या विभागामध्ये साधारणपणे रंगाचे विश्लेषण, अपघातामध्ये सापडलेल्या वाहनावरील रंग, सिमेंटचे नमुने तपासणे, चोरीच्या गाडीचे इंजिन / चासीस नंबर तपासून मूळ नंबर शोधणे यांसारखी परीक्षणे केली जातात.

**७) दारूबंदी विभाग :**

या विभागात रक्तामधील अल्कोहोलचे प्रमाण निश्चित करण्याचे परीक्षण, गावठी दारूचे परीक्षण यांसारखी परीक्षणे करण्यात येतात.